*सं.फौ.ख.क्र.१/ २०२३*
*निशाणी क्र. ६ लगत*

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – सुर्यकांत भिकाजी राघव , वय – ४९ वर्षे,

व्यवसाय – नोकरी

रा. – पुरळ, हुर्शी, ता.देवगड

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.**

०१. सन २०२२ मध्ये घटना पुरळ – कोंडामा येथे संध्याकाळी ६.४५ च्या दरम्यान घडली होती. मी देवगड वरुन पडेल कॅन्टीन येथे माझ्या मोटारसायकल वरुन जात होतो. मला मोटारसायकलचा नंबर सांगता येणार नाही. थोडे पुढे गेल्यानंतर पडेल कॅन्टीन येथून देवगड कडे जाणारी समोरुन एक चारचाकी सुमो गाडी आली. मी पुढे गेल्यावर मला पाठीमागून आवाज आला. मी बघितले तेव्हा ते मोटारसायकलस्वार पडला होता. रस्त्याच्या बाजूला मोटारसायकलस्वार पडला होता. अपघात कोणाच्या चुकीमुळे घडला ते मला सांगता येणार नाही. त्याठिकाणी बरेच लोक जमले होते. आम्ही सर्वांनी मोटारसायकलस्वाराला पडेल सरकारी हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो होतो. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. सुमो चालकाला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज तो न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञा श्रीमती एस.एस. कालेकर यांचे मार्फत.**

०२. मी ड्रायव्हरची नोकरी करतो. यातील मयत मेकॅनिकचे काम करत होता किंवा कसे हे मला माहीत नाही. हे खरे की, मयत माझ्या ओळखीचा होता. हे खरे नाही की, घटनेबाबत मला पोलिसांनी व तेथे जमलेल्या लोकांनी सांगितले. हे खरे की, सुमो गाडीच्या वेगाबाबत मला काही सांगता येणार नाही. हे खरे की, घटना कोणाच्या चुकीमुळे झाली हे मी सांगू शकत नाही. हे खरे की, घटनास्थळ वर्दळीचे ठिकाण आहे व रोड अरुंद आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि.२१/०१/२०२५